SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR KNOWLEDGE RESOURCE CENTER
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र
Estd. 1962
"A-" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52
Phone (Direct) : +91-0231- 2609204, Office : 2609205, Deputy Librarian : 2609210, 2609421
Asst. Librarian : 2609212 Stack : 2609212, Circulation : 2609210,
Periodical : 2609208, Archival : 2609336, Reference : 2609209
Website : URL : http://www.unishivaji.ac.in/library E-mail : subbkl@unishivaji.ac.in

Ref. No. SU/ BBKKRC/ 2022-23/ 387 Date: 07 FEB 2023

प्रति,

**मा. प्रकाशक / ग्रंथविक्रेते इ.**

महोदय / महोदया,

आपणास माहितच आहे की, दिक्षांत समारभांचे औचित्य साधून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर प्रतिवर्षी ग्रंथमहोत्सवाचे भव्य आयोजन करते. सलग १७ व्या वर्षी आम्ही हा उपक्रम राबवत आहोत.

या वर्षीचा ग्रंथमहोत्सव हा दिनांक १५-०२-२०२३ ते १६-०२-२०२३ या दरम्यान घेण्याचे नियोजन केलेले आहे. दि. १६-०२-२०२३ रोजी शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दिक्षांत समारंभ माननीय श्री. भगतसिंग कोश्यारी, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, अध्यक्ष, इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स, नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत. मा. कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथदिंडी पालखीचे आयोजनही सदर दिवशी होणार आहे. या ग्रंथमहोत्सवात सर्व महाविद्यालयांचे ग्रंथपाल उपस्थित राहणार आहेत. तेंव्हा हा 'ग्रंथमहोत्सव २०२३' भव्य स्वरूपात आयोजित होईल यात शंकाच नाही.

याच बरोबर प्रकाशकांचा / पुस्तकविक्रेत्यांचा खप वाढणेकामी विद्यापीठ ग्रंथालयाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २४० संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षकांना / ग्रंथपालांना 'शिक्षकांची वैयक्तीक ग्रंथालय योजना (TPLS)' अंतर्गत व त्यांच्या ग्रंथालयासाठी पुस्तक खरेदी बाबत एका विशेष परिपत्रकाने अगोदरच कळविण्यात आलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मी आपणा सर्वास 'ग्रंथमहोत्सव २०२३' मध्ये आपला स्टॉल आरक्षित करण्याची आग्रहाची विनंती करीत आहे. या संदर्भात आपल्याला अधिकची माहिती पाहिजे असल्यास ई-मेलद्वारे director.krc@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.in तसेच दूरध्वनी क्र. - ०२३१/२६०९२०४, ०२३१/२६०९२०५ द्वारे मिळेल.

अधिकच्या माहितीसाठी कृपया ग्रंथालयातील खालील कर्मचा-यांशी संपर्क साधावा.

| अ. क्र. | नांव | विभाग | फोन नं. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. डी. बी. सुतार | प्र. संचालक, बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्र | ०२३१/२६०९२०४ |
| २ | श्रीमती. एस. एस. पाटील | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, ग्रंथ उपार्जन विभाग | ०२३१/२६०९२०५ |
| ३. | डॉ. एस. आर. बिर्जे | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, देवघेव विभाग | ०२३१/२६०९२१० |

सोबत स्टॉल आरक्षित करण्याबाबतचे नियम व अटी यांची यादी जोडलेली आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,
07/02/2023
डॉ. डी .बी. सुतार
समन्वयक,
ग्रंथमहोत्सव २०२३

## स्टॉल आरक्षित करण्याबाबतचे नियम व अटी

१) जागाभाडे रक्कम रू. २,०००/- फक्त दोन दिवसासाठी राहील. सदर रक्कम ऑनलाईन सेवेमार्फत https://paysuk.unishivaji.ac.in/bwayspayonline/ या संकेतस्थळाखाली आपला स्वतःचा लॉगीन नेम व पासवर्ड तयार करून दिनांक १४-०२-२०२३ पर्यंत E.4.R.19 या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली विद्यापीठात भरावी. Online पैसे भरल्यानंतर तसा e-mail कार्यालयाच्या माहितीसाठी director.krc@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.in या अॅड्रेसवर अथवा खाली दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा. विहीत मुदतीपर्यंत पैसे न भरल्यास स्टॉलचा ताबा देण्यात येणार नाही.

२) स्टॉल ची संख्या मर्यादित (३०) असुन 'प्रथम येणा-यास प्रथम संधी' या तत्वानुसार दि. १४-०२-२०२३ पर्यंत रक्कम भरणाऱ्या व्यक्तिंनाच स्टॉल लावणेसाठी आमंत्रित करण्यात येईल.

३) एकदा जागाभाडे म्हणुन भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाहीत.

४) जागाभाडे अंतर्गत प्रत्येक स्टॉलला ३ टेबल व ३ खुर्च्यांचा पुरवठा करण्यात येणार असून, अधिकचे फर्निचर साहित्य उदा. टेबल्स, खुर्च्या, इलेक्ट्रॉनिक पॉइंटस, लाईटस्, फॅन, टेबल क्लॉथ इ. हवे असल्यास तसे आगाऊ कळविल्यास नियमाप्रमाणे त्याचे अधिकचे पैसे भरून अधिकचे साहित्य घेता येईल.

५) पुस्तक विक्रेते / स्टॉल धारक स्वतःचे रॅक, कपाट व फर्निचर साहित्य मांडणीसाठी आणू शकतात.

६) दिलेल्या प्रत्येक स्टॉलची जबाबदारी ज्या त्या स्टॉल धारकाने घ्यावी. स्टॉल मधील कोणतेही साहित्य विद्यापीठाच्या अधिविभागात /इमारतीत /खोल्यांमध्ये ठेवता येणार नाही.

७) विद्यापीठामार्फत विद्यापीठ सुरक्षा स्टॉल भोवती पुरवण्यात येईल.

८) ग्रंथमहोत्सव दरम्यान स्टॉल धारकांनी त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यापीठ गेस्टहाउसमध्ये चार्जेस भरून अथवा इतरत्र स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच जेवणाची व्यवस्था स्टॉल धारकांच्या आवश्यकतेप्रमाणे पुर्वसुचना दिल्यास योग्य ते चार्जेस घेऊन गेस्टहाउस विभागामार्फत केली जाईल. त्यासाठी त्यांनी तेथे संपर्क साधावा. ( गेस्टहाउस फोन नं. - ०२३१/२६०९२६८ )

९) कोणत्याही नैसर्गिक आपत्तीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१०) ड्रॉ पध्दतीने स्टॉल चे नंबर काढण्याबाबत सर्व निमंत्रित स्टॉलधारकांची एकत्रित बैठक दि. १४-०२-२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता ग्रंथालयात घेण्यात येईल. एकदा ड्रॉ पध्दतीने देण्यात आलेला स्टॉल क्रमांक नंतर बदलता येणार नाही. सर्व स्टॉल धारकांनी १४ तारखेलाच स्टॉल चा ताबा घेऊन त्याचदिवशी मांडणी करणे बंधनकारक राहील. दि. १५/०२/२०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यापूर्वीच वरीलप्रमाणे दि. १४-०२-२०२३ रोजी रात्री स्टॉल मांडणी करावी.

११) ग्रंथप्रदर्शन स्टॉल बंद झाल्यानंतर स्टॉल धारकांना रात्री स्टॉल मध्ये थांबता येणार नाही.

१२) पुस्तक विक्रीबाबतच्या काही योजना, कमिशन विशेष सवलत योजना असल्यास विक्रेते विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी थेट संपर्क करू शकतात. महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या पुढील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**http://www.unishivaji.ac.in/bcud/College-List**

१३) ग्रंथमहोत्सव २०२३ संबधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील. आपण आपले बुक स्टॉल त्वरीत नोंदवावेत ही नम्र विनंती.

१४) ग्रंथमहोत्सवाच्या शेवटच्या दिवशी रात्री १०.०० पर्यंत स्टॉल धारकांनी स्टॉल ची जागा रिकामी करून देणे बंधनकारक राहील.

इतर अतिरिक्त माहितीकरीता पुढील बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय) कर्मचाऱ्यांशी संपर्क साधा.

| अ. क्र. | नांव | विभाग | फोन नं. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. एस. आर. बिर्जे | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, देवघेव विभाग | ०२३१/२६०९२१० |
| २ | श्रीमती. एस. एस. पाटील | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक,ग्रंथ उपार्जन विभाग | ०२३१/२६०९२०५ |
| ३. | डॉ. सी. एन. गुरव | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, स्टॅक विभाग | ०२३१/२६०९२१२ |

- **ग्रंथप्रदर्शनाचा कालावधी** : १५-०२-२०२३ ते १६-०२-२०२३
- **प्रदर्शनस्थळावरील स्टॉलचे भाडे** : रु. २०००/- प्रति स्टॉल दोन दिवसांकरिता
- **स्टॉल वाटपाकरिता बैठकीची वेळ** : १४-०२-२०२३ रोजी दुपारी १.०० वाजता
  स्थळ : बॅ.ख .बा . ज्ञान स्त्रोत केंद्र, शि. वि., कोल्हापूर
- Online payment URL : https://paysuk.unishivaji.ac.in/bwayspayonline/

( नवीन नोंदणीकरिता स्वतः चे लॉगिन व पासवर्ड निर्माण करा. )

*************************************************************************

unishivaji.ac.in

⇩

Quick Links

⇩

Online Receipt

⇩

Online Receipt Portal

⇩

Login

⇩

For Others Registration

⇩

New Payment

⇩

Purpose → Consultancy Fees

⇩

Particulars -

⇩

Bank – AXIS/BOM/BOI

For Student PRN/Application ID is Login ID and Password

⇩

Campus Students

⇩

Purpose → Tuition Fees

⇩

Dept. – B. Tech

⇩

B. Tech Part – II, III, IV
Open/OBC/SC/ST/SBC/NT

⇩

Particulars -

⇩

Bank - AXIS/BOM/BOI